MHKO100001062014

## रे.क.नं. ५२/२०१४ मधील निशाणी क्र. ३६ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ शिवराई केचाप्पा पुजारी यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ शिवराई केचाप्पा पुजारी हे दिनांक ०९/०१/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. सदर दावा स्थावर मिळकती संदर्भातील आहे. प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी टाळाटाळ केलेली नाही. वादी हे शेतकरी असून ते धनगर समाजाचे अशिक्षीत आहेत व त्यांना कायदयाचे ज्ञान नाही. सबब प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून वारस रेकॉर्डवर घेणेची विनंती केली आहे.

**२.** प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादी यांनी जाणूनबुजून विलंब केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**३.** वादी यांचा अर्ज वाचला. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे. दोन्ही बाजुचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन व मनाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वादी यांनी निशाणी ३४ चे वर्णन यादीसोबत प्रतिवादी क्र.२ यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. शिवराई केचाप्पा धनगर ही दिनांक ०९/०१/२०२१ रोजी मयत झाल्याचे अभिलेखावर दाखल मृत्यू प्रमाणपत्रावरून दिसून येते. वादी यांनी निशाणी ४० वर शिवराई

केंचाप्पा पुजारी व शिवराई केंचाप्पा धनगर ही एकच व्यक्ती असल्याबाबतचे शपथपत्र अभिलेखार दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.२ शिवराई केचाप्पा पुजारी यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यास दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.२ शिवराई केचाप्पा पुजारी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस ४३ महिन्यांचा विलंब केला आहे हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) खर्चादाखल देणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.09.26 11:13:28 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २५/०९/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज